| MHWR030072802015 | खटला दाखल तारीख – | २८.११.२०१५ |
|---|---|---|
| | खटला नोंदणी तारीख – | २८.११.२०१५ |
| | खटला निकाल तारीख– | ०८.०९.२०२६ |
| | कालावधी – १० वर्ष, ०९ महिने, १० दिवस. | |

**भाग –' अ '**

**Form No. XXXII**

**(Title Page of the Judgment)**

**(Para 44 (i) of Chapter VI of Criminal Manual)**

## अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.९), वर्धा, यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी – श्रीमती एम.आर.चव्हाण–हिवराळे)

**नियमित फौजदारी खटला क्र. ६५३/२०१५** — **अपराध क्र. २०२/२०१५**

[MHWR030072802015] — **निशाणी क्र. ३०**

महाराष्ट्र शासन तर्फे }
पोलीस निरीक्षक, }
पोलीस स्टेशन, सेवाग्राम, }
ता. व जि. वर्धा. } ... अभियोग पक्ष

**–वि रु ध्द–**

१. रविंद्र बजरंगजी गोमासे, }
वय – ६९ वर्षे, व्यवसाय – शेत मजुरी }

२. सौ. रेखा रविंद्र गोमासे, }
वय – ५३ वर्षे, व्यवसाय – मजुरी }
दोघे राहणार – वार्ड क्र. ४, पवनार, }
ता. जि. वर्धा. } ... आरोपी

........................................................................................................................

श्रीमती डी.पी. कोठारी, सरकारी अभियोक्ता सरकार पक्षातर्फे.
श्री. आर.बी. अंबादे, विधीज्ञ आरोपींतर्फे.

........................................................................................................................

**दोषारोप – भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये.**

**भाग –' ब '**

**(Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याचा दिनांक | २३.०६.२०१५ |
| २) | प्रथम खबर अहवाल दिनांक | २३.०६.२०१५ |
| ३) | दोषारोप पत्र दाखल झाल्याचा दिनांक | २८.११.२०१५ |
| ४) | दोषारोप निश्चिती दिनांक | २८.०८.२०१७ |
| ५) | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १९.०१.२०१८ |
| ६) | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ०८.०९.२०२६ |
| ७) | न्यायनिर्णयाचा दिनांक | ०८.०९.२०२६ |

**आरोपीचा तपशील**

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | रविंद्र बजरंगजी गोमासे | ०३.०८.२०१५ | ०३.०८.२०१५ | भा.दं.वि. कलम ३४१,३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ | दोषी कलम ३२३ भा.दं.वि. करीता. | होय. | नियमाप्रमाणे. |
| २) | सौ. रेखा रविंद्र गोमासे | ०३.०८.२०१५ | ०३.०८.२०१५ | भा.दं.वि. कलम ३४१,३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ | निर्दोष | निर्दोष | --- |

## भाग –' क'

## (Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual)
## LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES

**अ. अभियोग पक्ष –**

| अनु.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १) | ललीता सर्जेराव उमाटे | ०९ | साक्षीदार |
| २) | शेषराव तानबाजी शेंडे | ११ | फिर्यादी |
| ३) | नरेंद्र बजरंगजी गोमासे | १४ | पंच |
| ४) | पंकज कृष्णाजी नेहारे | १६ | पंच |
| ५) | गजानन महादेवराव धुर्वे | १७ | वैद्यकीय अधिकारी |
| ६) | संतोष विद्याभुषण पांडे | १९ | तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर –**

| अनु. क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

क. न्यायालयीन साक्षीदार असतील तर -

| अनु. क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

निशाणी कागदपत्रांची यादी

ड. अभियोग पक्ष -

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १) | फिर्याद | १२ |
| २) | छापील प्रथम खबर | १३ |
| ३) | घटनास्थळ पंचनामा | १५ |
| ४) | वैद्यकीय अहवाल | १८ |
| ५) | अटक फॉर्म | २० व २१ |

इ. बचाव पक्ष -

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| --- | --- | --- |

ई. भौतीक वस्तु -

| अनु. क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| --- | --- | --- |

# न्यायनिर्णय

( घोषित दिनांक : ०८/०९/२०२६ )

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६०, कलम ३४१, ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

२. **सरकार पक्षाचे प्रकरण थोडक्यात खालील प्रमाणे आहेः**

फिर्यादी शेषराव तानबाजी शेंडे हे नमुद ठिकाणी राहतात व शेत मजुरी

करतात. फिर्यादी हे ललिता उमाटे यांचे शेत मकत्याने करतात. दिनांक २३/०६/२०१५ रोजी अंदाजे ११.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी हे शेताची मालक ललिता उमाटे हिचेसह बैलबंडीने पेरणी करण्याकरिता जात होते. त्यावेळी आरोपी क्र. १ ने रस्त्यामध्ये त्याची बंडी आडवी करून त्यांचा रस्ता बंद केला. तेव्हा शेत मालक ललिता हिने आरोपीस त्याबाबत विचारणा केली असता त्याने तिच्यासोबत वाद घातला आणि तिला शिवीगाळ करून ढकल–ढुकल केले. त्यानंतर फिर्यादी हे ललिता हिला वाचवण्याकरिता गेले असता आरोपी क्र. १ ने फिर्यादीला लाथाबुक्क्याने मारहाण करून खाली पाडले आणि त्यांच्या छातीवर बसून त्यांच्या डाव्या गालाला चावा घेतला. त्यामुळे त्यांना रक्त येऊन सुजन झाली. त्यावेळी आरोपी क्र.२ हिने शेत मालकिन ललिता हिला सुद्धा शिवीगाळ करून मारहाण केली. सदरहू फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली.

**३.** फिर्यादीच्या तक्रारीनुसार पोलीस ठाणे, सेवाग्राम येथे गुन्हा क्र. २०२/२०१५ भा.दं.वि. कलम ३४१, ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ नुसार गुन्ह्याची नोंद झाली व गुन्हा तपासात घेण्यात आला. तपासकामी तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती त्यांनी आरोपींविरूध्द वरील कलमांतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरूध्द भा.दं.वि. कलम ३४१, ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ खालील दंडनिय अपराधाकरीता नि.क्र. २ प्रमाणे दोषारोप निर्धारित केले. आरोपींनी त्यांना गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी केली. हवे तितके साक्षीदार झाल्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपींचे फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ चे बयाण अनुक्र. नि.क्र. २२ व २३ खाली नोंदविण्यात आले. त्यात आरोपींनी जुन्या वादाच्या कारणावरुन त्यांना या प्रकरणात गोवण्यात आले, असा बचाव घेतल्याचे दिसून येते.

**५.** दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. सरकारी अभिवक्ता श्रीमती डी.पी. कोठारी यांनी अभिलेखाप्रमाणे युक्तिवाद केला असून आरोपींचे वकील श्री. आर.बी. अंबादे यांनी आरोपींविरुद्ध पुरावा न आल्यामुळे आरोपींना निर्दोष बरी करण्यात यावे, अशी विनंती या न्यायालयापुढे केलेली आहे. सदर प्रकरणाच्या तथ्य व कथनानुसार खालील मुद्दे या न्यायालयापुढे न्यायनिवाडाकरीता विचारार्थ उपस्थित झालेले असून त्यांचे निष्कर्ष कारणेमिमांसा खालील प्रमाणे नोंदविण्यात आलेले आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, दिनांक २३/०६/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजेच्या दरम्यान मौजा पवनार येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला इच्छापूर्वक अटकाव करून गैरपणे निरूध्द केले, आणि त्याव्दारे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ३४१ सहकलम ३४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला ? | **नकारार्थी..** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त तारखेला, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला दाताने गालावर चावा घेवुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली, आणि त्याव्दारे त्यांनी भारतीय दंड विधान कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला ? | **नकारार्थी..** |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त तारखेला, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व ललिता उमाटे यांना मारहाण करून स्वेच्छेने दुखापत पोहोचविली, आणि त्याव्दारे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला ? | **आरोपी क्र.१ बाबत होकारार्थी व आरोपी क्र.२ बाबत नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त तारखेला, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन उद्देशपूर्वक शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने शिवीगाळ करून फिर्यादी व ललिता उमाटे यांचा अपमान केला आणि त्यायोगे त्यांना प्रक्षोभीत केले व त्यामागे त्यांच्या हातून अपराध घडावा असा त्याचा उद्देश होता, आणि त्याव्दारे त्यांनी भारतीय दंड विधान कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला ? | **नकारार्थी..** |
| ५. | आदेश काय ? | **आरोपी क्र.१ ला कलम ३२३ भा.दं.वि. करीता दोषी धरण्यात आले आणि आरोपी क्र. १ व २ यांना इतर आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रं. १ ते ४ करीता –**

**६.** सदर प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३४१, ३२४, ३२३, ५०४ अन्वये गुन्हा असल्याने सदर कलमांची आवश्यक तत्वे सिध्द करण्याची जबाबदार अभियोग पक्षावर कलम १०१ व १०२ भारतीया पुरावा कादया अन्वये आहे.

**७.** सदर प्रकरणात अभियोग पक्षाने त्यांचे कथन सिध्द करण्याकरिता फिर्यादी सा.क्र.१ शेषराव शेंडे नि.क्र. ११ यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांच्या तक्रारी मधील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. तसेच त्यांनी त्यांची तोंडी तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल यांना नि.क्र. १२ व १३ अन्वये सिद्ध केलेले आहे. त्यांनी

उलट तपासामध्ये मान्य केले आहे की, त्यांना डॉक्टरांनी औषध उपचार करून लगेच सुट्टी दिली होती. ते सदर प्रकरणातील शेतमालक ललिता हिचे शेत ठेक्याने वाहत होते. त्यांची त्या शेतावर वाहीपेरी होती. शेतमालक ललिता हिच्या शेतामध्ये जाण्याकरिता आरोपीच्या शेतामधून जावे लागत नाही. ललिता व या प्रकरणातील आरोपी क्र.१ रविंद्र यांचे शेत जुन्या एकाच सर्वे नंबरचे दोन भाग आहेत. ललिता ही आरोपी क्र.१ ची सख्खी बहिण आहे. घटनेच्या वेळी दोन्ही शेतांची शासकीय मोजणी झाली नव्हती. ती मोजणी घटनेच्या एक वर्षाआधी झाली होती. ललिताच्या शेताला उत्तर–दक्षिण पांधन आहे. सदर बांधणावर जाऊन ललिताचे शेत लागते. ललिताच्या शेतातून उत्तर–दक्षिणेकडे जाणारे सगळे कास्तकार त्या पांदणावरून येणे–जाणे करतात.

८. सा.क्र.१ ललिता उमाटे नि.क्र. ०९ ही या प्रकरणातील पिडीत असून ती आरोपी क्र.१ ची सख्खी बहिण आहे. मूळतः वाद हा ललिता व आरोपींमध्ये झालेला दिसून येत आहे. सदर साक्षदाराने तिच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, घटना दोन वर्षांपूर्वी पवनार येथे तिच्या शेतामध्ये सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास घडली होती. त्यावेळी ती फिर्यादी सोबत शेतामध्ये पेरणी करण्याकरिता जात असताना आरोपीने दोन बंड्या रस्त्यावर आडव्या करून त्यांचा रस्ता अडविला होता. तसेच त्याबाबत विचारणा केली असता आरोपी तिच्या अंगावर धावून गेला. तिला ढकल–ढुकल केले, खाली पडले व मारहाण केली. त्यानंतर त्याने फिर्यादीला मारहाण केली आणि त्याच्या गालाचा चावा घेतला.

९. सदर साक्षदार हिने उलट तपासामध्ये मान्य केले आहे की, घटना अंदाजे एक तासपर्यंत चालली. ती घटनेच्या दिवशी पोलीस स्टेशन मध्ये सुमारे दोन वाजताच्या सुमारास गेलेली होती. पोलीस स्टेशनची कार्यवाही अंदाजे १० मिनिटे चालली. त्यादिवशी पोलिसांनी तिला व फिर्यादी यांना घटनेबाबत विचारपूस केली होती. तिने पोलिसांना घटनेबाबत जे काही सांगितले ते पोलिसांनी लिहून घेतले. त्या दिवशी पोलीस त्यांच्यासोबत शेतामध्ये गेले होते. त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला आणि तो अंदाजे १०

मिनिटापर्यंत चालला. तेच नव्हे तर सदर तारखेनंतर पोलीस कधीही तिच्याकडे चौकशी करिता गेले नाही. साक्षीच्या दिवशी तिला वाचून दाखवण्यात आलेले बयाण हे पोलिसांनी घटनेच्या १५ दिवसानंतर घेतले होते. तिने प्रथमतः या न्यायालयामध्ये बयाण दिलेले आहे. तसेच तिने उलट तपासामध्ये पुढे मान्य केले आहे की, सदर शेताचा ७/१२ उतारा हा तिचे वडील व त्या वेळेचे इतर वारस यांच्या नावावर आहे. सदर शेताचे ७/१२ उतारे वेगवेगळे झालेले नाहीत. त्यामध्ये रस्ता वहिवाट लिहून लिहिणारे वाटणी पत्र नाही. ज्या शेतामध्ये आरोपीची बैलबंडी आडवी होती ते तिचे शेत नव्हते. तिचे व आरोपी क्र.१ चे सुरुवातीपासून वाटणीच्या कारणावरून वाद आहेत. तिचा दुसरा भाऊ नरेंद्र आणि आरोपी क्र.१ चे देखील वाटणीच्या कारणावरून वाद आहेत. तिने फिर्यादीच्या गालावरील जखम पाहिली होती, परंतु तिचे स्वरूप तिला माहिती नाही. इतर विसंगत कथन तिने फेटाळलेले आहे. सदर साक्षदार ही या प्रकरणातील मूळ पिडीत असल्यामुळे आणि तिचे सदर घटनेबाबतचे कथन उलट तपासामध्ये मूळतः स्थिर राहिल्यामुळे ते विश्वास पात्र आहे.

**१०.** सा.क्र.३ नरेंद्र गोमासे नि.क्र.१४ व सा.क्र.४ पंकज निहारे नि.क्र.१६ हे घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १५ वरील पंच साक्षदार आहेत. या दोघांनीही त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा झाला असे कथन केलेले आहे. त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर सिद्ध केलेला आहे. परंतु सा.क्र.४ पंकज निहारे नि.क्र.१६ यांनी सदर घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १५ त्यांच्या घटनास्थळावर जाण्याच्या पूर्वी झालेला होता व त्यांनी तो वाचून बघितला नाही त्यामुळे त्यातील मजकूर खरा आहे किंवा कसे हे त्यांना माहिती नाही असे त्यांनी कथन केलेले आहे. परंतु सा.क्र.३ नरेंद्र गोमासे नि.क्र.१४ यांनी ज्या दस्तावर सही केली त्यावर त्यांनी देखील केली होती असे त्यांनी कथन केलेले आहे. यात शंका नाही की, सदर साक्षदाराने उलट तपासामध्ये पंचनाम्यातील मजकूर त्याच्या समक्ष न लिहिल्यामुळे किंवा वाचून न बघितल्यामुळे खरा किंवा कसे असे कथन केले आहे. परंतु त्याने सा.क्र.३ नरेंद्र गोमासे नि.क्र.१४ याने ज्या घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली होती त्यांनी त्यावरच सही केली, असे कथन केलेले आहे. सा.क्र.३ नरेंद्र गोमासे नि.क्र.१४ यांची

घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १५ बाबतची साक्ष उलट तपासामध्ये स्थिर राहिलेली आहे. या उलट सा.क्र.४ पंकज निहारे नि.क्र.१६ यांनी घटनास्थळावरील त्यांची हजेरी किंवा त्या दिवशी त्यांच्या समक्ष कार्यवाही झाली नाही असे कथन केलेले नाही. सदर दोन्ही साक्षदारांचे साक्ष कथन या प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१५ बाबत गृहीत धरण्यात येत आहे.

**११.** सा.क्र.५ वैद्यकीय अधिकारी गजानन धुर्वे नि.क्र. १७ यांनी साक्ष कथन केले आहे की, त्यांनी दिनांक २३/०६/२०१५ रोजी ललिता उमाटे हिला तपासले. त्यावेळी तिला तिच्या उजव्या हाताच्या मनगटावर जखम झाल्याचे त्यांना आढळून आले. ती जखम ०५ ते ०७ दिवसात बरी होणारी असून साध्या स्वरूपाची होती आणि त्याबाबतचे देण्यात आलेले वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र. १८ सदर साक्षदाराने सिद्ध केलेले आहे.

**१२.** सा.क्र. ०६ संतोष पांडे नि.क्र. १९ हे या प्रकरणातील तपासी अधिकारी आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांना सदर गुन्ह्याची केस डायरी तपासकामी मिळाली होती. त्यासोबत फिर्याद, छापील प्रथम खबर, वैद्यकीय अहवाल व घटनास्थळ पंचनामा मिळाला होता. त्यांनी फिर्यादी व साक्षदारांचे बयाण नोंदविले. आरोपींना अटक करुन अटक फॉर्म अनुक्रमे नि.क्र. २१ व २१ तयार केले. त्यांनी आरोपींना ओळखले असून आरोपींविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले आहे. त्यांनी उलट तपासामध्ये मान्य केले आहे की, केस डायरी सोबत बयाण मिळाले नव्हते. त्यांनी घटनेच्या १४ ते १५ दिवसानंतर साक्षदारांचे बयाण नोंदविले होते. त्यांनी त्यांच्या उलटतपासणीत विसंगत कथन फेटाळले आहे. सदर साक्षदार हा कार्यालयीन साक्षदार आहे. त्याचे विरूध्द आक्षेपार्ह कुठलेही कथन अभिलेखात सिध्द झालेले नाही आणि त्यांचे साक्ष कथन त्यांच्या तपासाच्या अनुषंगाने स्थिर राहलेले आहे.

**१३.** सदर प्रकरणातील पुराव्यांचे अवलोकन केले असता सा.क्र. १ ललिता उमाटे नि.क्र. ०९ यांनी त्यांच्या पुराव्यात घटनेचे कारण, ठिकाण आणि आरोपी क्र.१ रविंद्र

याची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्या पेरणीसाठी शेतात गेल्या असताना आरोपी क्र.१ रविंद्र याने त्यांना अडविले, त्यांच्याशी वाद केला आणि काठीने मारहाण केली. त्यांच्या उलट तपासणीमध्ये आरोपी व त्यांच्यामध्ये शेतजमिनीच्या बांधावरून पूर्वीपासून वाद असल्याचे पुढे आले आहे. बचाव पक्षाने त्यावरून खोटी केस दाखल केल्याची शक्यता सुचविली आहे. परंतु पूर्ववैमनस्य ही दुधारी तलवार आहे. ते खोट्या गुंतवणुकीचे कारण असू शकते, तसेच प्रत्यक्ष घटनेचा उद्देश सुद्धा असू शकते. म्हणून केवळ पूर्वी वाद होता, एवढ्याच कारणावरून जखमी साक्षदाराची साक्ष नाकारता येणार नाही. उलट तपासणीतील काही बाबींवरून फिर्यादीच्या साक्षीत किरकोळ त्रुटी व वगळलेल्या बाबी दिसतात. तथापि मुख्य घटनेबाबत, घटनास्थळ, आरोपी रविंद्रची उपस्थिती, वाद व तिच्यावर झालेली मारहाण, याबाबत त्यांची साक्ष मुळतः अबाधित राहिलेली आहे.

- ***तहसिलदार सिंह विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य*** [1]

यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निर्देशित केल्याप्रमाणे आहे की, ''कुठलेही विसंगत विरोधात्मक कथन जो कुठलाही पक्ष सिध्द करेल ते त्याचे वतीने वाचण्यात येईल.'' सबब, सदर साक्षदारांचे साक्ष कथन विसंगती उत्पन्न करणारे असुन ते अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देणारे आहे. ते अभियोग पक्षाच्या इतर पुराव्याअन्वये गृहीत धरण्यात येते.

- ***जर्नेल सिंग विरुद्ध पंजाब राज्य***[2] आणि ***अब्दुल सईद विरुद्ध मध्य प्रदेश राज्य***[3]

या प्रकरणांमध्ये जखमी साक्षदाराच्या साक्षीस विशेष पुराव्यात्मक महत्व असल्याचे स्पष्ट केले आहे. जखमीची घटनास्थळी उपस्थितीची अंतर्गत हमी असते आणि ठोस कारणांशिवाय अशा साक्षदाराची साक्ष नाकारता येत नाही.

1 *(१९५९ ए.आय.आर. १०१२).*
2 *(२००९) ९ एस.सी.सी. ७१९.*
3 *(२०१०) १० एस.सी.सी. २५९.*

**१४.** प्रस्तुत प्रकरणात सा.क्र.१ ललिता उमाटे नि.क्र. ०९ यांची घटनास्थळी उपस्थिती केवळ त्यांच्या तोंडी साक्षीवर अवलंबून नाही. त्यांच्या शरीरावर प्रत्यक्ष जखम आढळली असून तिला वैद्यकीय पुराव्याचे समर्थन आहे. त्यामुळे आरोपी रविंद्र याने सा.क्र.१ ललिता उमाटे नि.क्र. ०९ यांना मारहाण केल्याचा त्यांच्या साक्षीतील गाभा विश्वासार्ह आहे.

**घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १५ –**

**१५.** घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १५ मधून घटनास्थळाची भौगोलिक परिस्थिती व संबंधित शेतांची स्थिती दिसून येते. बचाव पक्षाने पंच साक्षदाराच्या पुराव्यातील काही त्रुटी निदर्शनास आणल्या असल्या, तरी घटनास्थळाबाबत फिर्यादीची आवृत्ती पूर्णपणे असंभव ठरविणारी कोणतीही बाब त्यातून पुढे येत नाही. घटनास्थळ पंचनामा हा प्रत्यक्ष मारहाणीचा सबळ पुरावा नाही. मात्र घटनास्थळ व अभियोजनाच्या कथनाची शक्यता तपासण्यासाठी पुष्टी करणारी परिस्थिती म्हणून त्याचा विचार करता येतो.

**वैद्यकीय पुरावा –**

**१६.** अभियोग पक्षाने सा.क्र.५ वैद्यकीय अधिकारी गजानन धुर्वे नि.क्र. १७ यांची साक्ष नोंदविली आहे. त्यांनी दिनांक २३/०६/२०१५ रोजी सामान्य रुग्णालया, वर्धा येथे ललिता उमाटे यांची वैद्यकीय तपासणी केली. त्यांना ललिता यांच्या उजव्या मनगटाच्या पार्श्व भागावर (lateral aspect) वर १ से.मी. × ०.५ से.मी. × ०.५ से.मी. आकाराची विदारित जखम (lacerated wound) आढळली. वैद्यकीय अधिकारी यांच्या मते जखम ताजी होती; ती कठोर आणि बोथट वस्तू (hard and blunt object) मुळे होऊ शकते; तिचा बरे होण्याचा काळ (healing period) साधारण ५ ते ७ दिवस होता; आणि जखम साध्या स्वरूपाची होती. त्यांनी दिलेले जखमेचा अहवाल नि.क्र. १८ वर आहे. हा वैद्यकीय पुरावा अत्यंत महत्त्वाचा आहे. ललिता यांनी स्वतःवर मारहाण झाल्याचे सांगितले असून त्याच दिवशी वैद्यकीय अधिकारी यांना त्यांच्या शरीरावर ताजी जखम आढळली. त्यामुळे त्यांच्या मौखीक पुराव्याला स्वतंत्र वैद्यकीय पुष्टीकरण मिळते.

१७. ***सोलंकी चिमणभाई उकाभाई विरुद्ध गुजरात राज्य***[4] आणि ***अब्दुल सईद*** या न्यायनिर्णयांनुसार वैद्यकीय पुराव्याचे सामान्यतः पुष्टीकारक स्वरूप असते; ocular version पूर्णतः अशक्य ठरविणारा वैद्यकीय पुरावा नसल्यास विश्वासार्ह प्रत्यक्ष साक्ष केवळ किरकोळ वैद्यकीय फरकामुळे फेटाळता येत नाही. येथे उलटपक्षी प्रत्यक्षदर्शी आणि वैद्यकीय पुरावा एकमेकांना मूलभूत बाबतीत पुष्टी देतात.

१८. सा.क्र. ०६ संतोष पांडे नि.क्र. १९ यांनी ते दिनांक २३/०६/२०१५ रोजी पोलीस ठाणे, सेवाग्राम येथे कार्यरत असल्याचे सांगितले आहे. संबंधित अपराधाची नोंद झाल्यानंतर त्यांनी तपास केला, घटनास्थळ पंचनामा प्राप्त/तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि पुढे आरोपींना अटक केली. अटक फॉर्म व इतर तपास कागदपत्रे त्यांनी सिद्ध केली आहेत. त्यांच्या उलट तपासणीत त्यांनी ललिता व शेखर यांच्या जबाबातील काही वगळलेल्या बाबी/तफावत मान्य केली आहे. अशा वगळलेल्या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. मात्र प्रत्येक वगळलेली बाब ही विसंगती होत नाही. ती अभियोग पक्षाच्या कथनांच्या मूळ गाभ्यावर परिणाम करणारी मुख्य वगळलेली कथने आहे का, हे पाहणे आवश्यक आहे. ललिता यांच्या शरीरावर घटनेनंतर ताजी जखम आढळणे, डॉक्टरांनी ती कठोर व बोथट वस्तू मुळे होऊ शकते असे सांगणे आणि ललिता यांनी आरोपी रविंद्र यास मारहाण करणारा म्हणून सातत्याने सांगणे, या मूलभूत बाबी तपासी अधिकाऱ्याच्या उलटतपासणीमुळे नष्ट झालेल्या नाहीत. पुराव्याचे एकत्रित अवलोकन केले असता खालील घटनाक्रम प्रथमतः निष्पन्न होतो. सर्व पुरावे एकत्रितरीत्या बघितले असता अभियोग पक्षाच्या पुराव्याची साखळी पुढीलप्रमाणे आहे –

- शेतजमिनीच्या बांधावरून पूर्वीचा वाद.
- दि. २३/०६/२०१५ रोजी ललिताची शेतात उपस्थिती.
- आरोपी रविंद्रशी वाद.
- रविंद्रकडून ललितावर मारहाण.

4 *ए.आय.आर. १९८३ एस.सी. ४८४*

- त्याच दिवशी वैद्यकीय तपासणी.
- उजव्या मनगटावर ताजी विदारित जखम.
- कठोर व बोथट वस्तूने अशी जखम होणे शक्य असल्याचे डॉक्टरांचे मत.
- वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र. १८

**१९.** या परिस्थिती एकमेकांपासून विलग नाहीत. उलट त्या एकमेकिंना पुष्टी देतात. सा.क्र.१ जखमी ललिता उमाटे नि.क्र. ०९ यांची साक्ष हा अभियोग पक्षाच्या खटल्याचा केंद्रबिंदू असून सा.क्र.५ वैद्यकीय अधिकारी गजानन धुर्वे नि.क्र. १७ यांच्या स्वतंत्र वैद्यकीय पुराव्याने तिच्या साक्षीला महत्त्वपूर्ण पुष्टीकरण प्राप्त होते. म्हणून आरोपी रविंद्रने ललिता उमाटे यांना स्वेच्छेने दुखापत केले, ही बाब अभियोग पक्षाने वाजवी संशयापलीकडे सिद्ध केली आहे.

**भा.दं.वि. चे कलम ३२४ की कलम ३२३?**

**२०.** सदर प्रकरणामध्ये फिर्यादी सा.क्र.१ शेषराव शेंडे नि.क्र. ११ यांचे कथनान्वये त्यांना आरोपी क्र.१ ने त्यांच्या डाव्या गालावर चावा घेतल्यामुळे त्यांना रक्ताची आणि सुजन आल्याची जखम झाली. परंतु याबाबत अभियोग पक्षाने कुठल्याही प्रकारे वैद्यकीय पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. या प्रकरणामध्ये सा.क्र.१ जखमी ललिता उमाटे नि.क्र. ०९ व सदर साक्षदार यांचेशी एकाच वेळी वाद झालेला आहे. परंतु त्याच वेळी सा.क्र.१ जखमी ललिता उमाटे नि.क्र. ०९ हिची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. परंतु सदर साक्षदाराची वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली नाही, हे कुठल्याही सतसतविवेकबुध्दी असणा–या व्यक्तीला पटणारे नाही. त्याचप्रमाणे फिर्यादी सा.क्र.१ शेषराव शेंडे नि.क्र. ११ यांना कुठल्या प्रकारची जखम झाली हे अभिलेखावर सिध्द झालेले नाही. सबब, भा.दं.वि. कलम ३२४ अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होत नाही .

**२१.** सदर प्रकरणामध्ये सा.क्र.१ जखमी ललिता उमाटे नि.क्र. ०९ हिने साक्ष

कथन केले आहे की, आरोपी क्र.१ ने तिला ढकल–ढुकल केली, तिला खाली पाडले व तिला मारहाण केली आणि तिला जखम झाली. सदर कथन फिर्यादी सा.क्र.१ शेषराव शेंडे नि.क्र. ११ यांनी देखील जसेच्या तसे वदलेले आहे. तसेच त्यांनी त्यांची तोंडी तक्रार नि.क्र.१२ व छापील प्रथम खबरी अहवाल नि.क्र. १३ सिध्द केले आहे. सदर प्रकरणामध्ये सा.क्र.५ वैद्यकीय अधिकारी गजानन धुर्वे नि.क्र. १७ यांच्या वैद्यकीय पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांना जखमीच्या उजव्या मनगटावर ताजी विदारित जखम आढळली असुन ती कठोर व बोथट वस्तुने होवू शकते असे त्यांनी नमुद केले आहे. त्यांनी वैद्यकीय अहवाल नि.क्र.१८ सिध्द केले आहे. भा.दं.वि. चे कलम ३२३ अन्वये सा.क्र.१ जखमी ललिता उमाटे नि.क्र. ०९ हिला आरोपी क्र.१ च्या कृत्यामुळे दुखापत झालेली आहे. भा.दं.वि. चे कलम ३२३ अन्वये केवळ दुखापत होणे अनिवार्य आहे. भा.दं.वि. चे कलम ३१९ अन्वये ''दुखापत'' म्हणजे एखाद्याला झालेली शारीरिक वेदना, आजार, रोग किंवा विकलता निर्माण करणे होय. या प्रकरणामध्ये अभियोग पक्षाच्या पुराव्यानुसार सा.क्र.१ जखमी ललिता उमाटे नि.क्र. ०९ हिला झालेली दुखापत ही वाजवी शंकेपलीकडे सिध्द झालेली आहे.

**२२.** अशा प्रकारे, अभियोग पक्षाने आरोपी क्र.१ कडून सा.क्र.१ ललिता उमाटे नि.क्र. ०९ हिला स्वेच्छेने दुखापत झाल्याची मूलभूत बाब संशयापलीकडे सिद्ध केली आहे. केवळ दुखापत करण्यासाठी वापरलेले साधन आणि जखमेचे स्वरुप हे अभियोग पक्षाने फिर्यादी सा.क्र.१ शेषराव शेंडे नि.क्र. ११ बाबत सिध्द केलेले नाही. मात्र, त्याच पुराव्यावरून त्याने फिर्यादी ललिता उमाटे यांना स्वेच्छेने दुखापत केली हे सिद्ध झाल्याने आरोपी क्र.१ रविंद्र बजरंगजी गोमासे यास भा.दं.वि. चे कलम ३२३ अंतर्गत दोषी ठरविणे न्यायोचित ठरते.

**भा.दं.वि. चे कलम ३४ (आरोपींचा समान हेतु) –**

**२३.** फौजदारी न्यायशास्त्रात प्रत्येक आरोपीची भूमिका स्वतंत्रपणे सिद्ध होणे

आवश्यक आहे. आरोपी क्र.२ रेखा गोमासे हि केवळ आरोपी क्र.१ रविंद्रची पत्नी आहे किंवा घटनास्थळी उपस्थित होती, यावरून तिच्याविरुद्ध समान उद्देश गृहीत धरता येत नाही. उपलब्ध पुराव्यात आरोपी क्र.१ रेखा हिच्या प्रत्यक्ष कृती आणि आरोपी रविंद्रसोबत पूर्वनियोजित अथवा घटनास्थळी विकसित झालेल्या समान हेतूचे ठोस व सुसंगत प्रमाण पुरेसे नाही. त्यामुळे भा.दं.वि. चे कलम ३४ चा आधार घेऊन आरोपी क्र.१ चे कृत्य आरोपी क्र.२ वर लादणे न्यायोचित नाही. सबब, आरोपी क्र.१ बाबत भारतीय दंड विधानाचे कलम ३२3 अन्वये गुन्ह्याची तत्वे वाजवी शंकेपलीकडे सिध्द झाली आहे. परंतु त्याबाबत आरोपी क्र.२ चे संगणमत होते हे सिध्द झालेले नाही. त्यामुळे आरोपी क्र.२ रेखा हिला संशयाचा लाभ देणे न्यायोचित ठरते.

**२४.** सदर प्रकरणात आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३४१ व ५०४ अन्वये देखील दोषारोप ठेवण्यात आले आहे. भा.दं.वि. चे कलम ३४१ अन्वये गुन्हा सिध्द होणेकरीता आरोपींनी फिर्यादीला इच्छापूर्वक अटकाव करून गैरपणे निरूध्द केले, हे सिध्द होण गरजेचे आहे. तसेच भा.दं.वि. चे कलम ५०४ अन्वये गुन्हा सिध्द होणेकरीता केवळ शिवीगाळ झाली असे म्हणणे पुरेसे नाही. आरोपीने हेतुपुरस्सर अपमान केला आणि त्यामुळे संबंधित व्यक्तीला सार्वजनिक शांतता भंग करण्यास किंवा अन्य गुन्हा करण्यास प्रवृत्त करण्याचा हेतू किंवा जाणीव होता, हे सिद्ध होणे आवश्यक आहे. उपलब्ध पुराव्यात मारहाणीची घटना सिद्ध होत असली तरी भा.दं.वि. चे कलम ३४१ व ५०४ चे स्वतंत्र आवश्यक घटक संशयापलीकडे सिद्ध करण्याइतका विशिष्ट व ठोस पुरावा नाही. सबब, अभियोग पक्ष आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३४१ व ५०४ अन्वये गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरले आहे. सबब, मुद्दा क्र.१, २ व ४ ला दोन्ही आरोपींबाबत नकारार्थी उत्तर देण्यात येत आहे. तसेच, मुद्दा क्र.३ चे निष्कर्ष आरोपी क्र.२ बाबत नकारार्थी नोंदविण्यात येत असुन मुद्दा क्र.३ चे निष्कर्ष आरोपी क्र.१ बाबत होकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्रं. ५ करीता –**

**२५.** वर नमुद कारणे व निष्कर्षांच्या अनुषंगाने आरोपी क्र.१ विरुध्द भा.दं.वि. चे कलम ३४१, ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा सिध्द होत नसल्याने तो त्याकरिता निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. तसेच आरोपी क्र.२ विरुध्द भा.दं.वि. चे कलम ३४१, ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा सिध्द होत नसल्याने ती सदर प्रकरणातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. परंतु आरोपी क्र.१ विरुध्द भा.दं.वि. चे कलम ३२३ अन्वयेचा गुन्हा सिध्द होत असल्याने आरोपी क्र.१ ला सदर गुन्ह्याकरीता दोषी ठरविण्यात येते. तसेच आरोपी क्र.१ ला भा.दं.वि. चे कलम ३२३ अन्वयेच्या गुन्ह्याकरीता दोषी ठरविण्यात आल्याने तो शिक्षेस पात्र आहे. परंतु आरोपी क्र.१ ला परिविक्षा अधिनियमाचा लाभ देणे अथवा आरोपी क्र.१ व त्याचे विद्वान वकिल आणि सहा. सरकारी अभियोक्ता यांचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकण्याकरीता प्रस्तुत न्यायनिर्णय तहकुब करण्यात येत आहे.

MANGALA GAJANAN HIVARALE
Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.09.08 16:45:58 +0530

स्थळ – वर्धा. (श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))
दिनांक ०८/०९/२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.९), वर्धा.

**न्यायनिर्णय पूर्ववत:**

**२६.** विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती कोठारी यांनी युक्तीवाद केला की, आरोपी क्र.१ ने हेतुपूरस्पर फिर्यादीला मारहाण केली आहे. सदर कृत्य हे पुर्ण विचारांती व तयारीने करण्यात आले होते. यावरुन आरोपी क्र.१ चा फिर्यादीला दुखापत करण्याचा उद्देश स्पष्ट होता हे दिसून येते. त्यामुळे समाजाला संदेश मिळण्यासाठी त्यांनी आरोपी क्र.१ ला जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली.

**२७.** त्याउलट आरोपींचे विद्वान वकिल श्री. अंबादे यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपी क्र.१ विरुध्द सिध्द गुन्हा साध्या व किरकोळ स्वरुपाचा असून हा त्याचा प्रथम

गुन्हा आहे. तसेच तो एक कौटुंबिक व जबाबदार नागरिक असून त्याचेवर कुटूंबाची जबाबदारी आहे. करिता त्याला कमीत कमी द्रव्यदंडाची शिक्षा देण्याची विनंती केली.

२८. सर्वप्रथम हे पाहणे आवश्यक आहे की, आरोपी क्र.१ हा परिवीक्षा अधिनियमाचा फायदा मिळण्यास पात्र आहे काय. यावरून आरोपी क्र.१ ची विपरित मनोवृत्ती व कायदयाची भिड न बाळगण्याचा बेगुमानपणा ठळकपणे दिसून येतात. तसेच आरोपी क्र.१ चा गुन्हा हा महिलेबाबत असुन त्याच्या सख्ख्या बहिणीबाबत आहे. अशा वादांमध्ये महिलेबाबत होणारा गुन्हा व त्याचे परिणाम फेटाळता येत नाही. या सर्व बाबींचा सारासार विचार करता, आरोपी क्र.१ हा परिवीक्षा अधिनियमाचा फायदा मिळण्यास पात्र नाही, या निष्कर्षाप्रत हे न्यायालय आले आहे.

२९. मात्र, आरोपी क्र.१ ची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची नाही. सबब, तो अधिक काळ सराईत गुन्हेगारांच्या संगतीत राहील्यास त्याचे भवितव्य नष्ट होण्याचा संभव नजरेआड करता येणार नाही. तसेच, आरोपी क्र.१ चे वय देखील विचारात घेणे गरजेचे आहे. आरोपी क्र.१ ला त्याने केलेल्या गुन्ह्याची जाणीव होवून त्याने गुन्हेगारी प्रवृत्तीस विन्मुख होणे आवश्यक आहे. त्यामुळे, शिक्षा ठोठावतांना सुवर्णमध्य गाठणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे दिलेली शिक्षा ही नगण्य असणे देखील योग्य नाही. आरोपी क्र.१ ला उदाहरणात्मक त्याचप्रमाणे प्रतिबंधात्मक शिक्षेचे सिध्दांत लक्षात घेवुन शिक्षा ठोठावणे अनिवार्य आहे. सबब, आरोपी क्र.१ याला न्यायालय उठेपर्यंत साधा कारावास व रुपये १०,०००/– द्रव्यदंडाची शिक्षा सुनावणे न्यायोचित होईल.

३०. प्रस्तुत घटनेमुळे जखमी ललिता संजय उमाटे हिला शारीरिक व मानसिक वेदना सहन कराव्या लागल्या आहेत. तसेच, तिला औषधोपचाराकरिता देखिल खर्च करावा लागलेला असणार आहे. सबब, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७(१) नुसार ललिता उमाटे हिला शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रासापोटी रुपये ५,०००/– नुकसान भरपाई देणे न्यायोचित होईल.

**३१.** सदर प्रकरणामध्ये जप्त मुद्देमाल नसल्यामुळे त्याबाबत आदेश नाही. या सर्व बाबींचा सांगोपांग विचार करता, हे न्यायालय पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे –

## आदेश

१. आरोपी क्र.१ रविंद्र बजरंगजी गोमासे याची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, ३२४ व ५०४ सह कलम ३४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी क्र.२ सौ. रेखा रविंद्र गोमासे हिची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

३. आरोपी क्र.१ रविंद्र बजरंगजी गोमासे यास फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(२) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२३ खालील गुन्ह्यात दोषी धरण्यात येते. आरोपी क्र.१ ला सदर गुन्ह्याकरिता न्यायालय उठेपर्यंत साधा कारावास व रुपये १०,०००/– (रुपये दहा हजार) द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. आरोपी क्र.१ ने द्रव्यदंड न भरल्यास तो ०३ महिने साध्या कारावासास पात्र राहील.

४. आरोपी क्र.१ याला सदर गुन्ह्यात अटक करण्यात आल्याचे तारखेपासुन ते त्याला जामीनावर मुक्त करण्यात आल्यापर्यंतचे कालावधीची वजावट, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ नुसार त्याला फर्माविण्यात आलेल्या मुळ कारावासाच्या शिक्षेतून देण्यात यावी.

५. आरोपी क्र.१ कडून द्रव्यदंडाची रक्कम वसूल झाल्यावर त्या रकमेपैकी रुपये ५,०००/– (रुपये पाच हजार) या प्रकरणातील जखमी ललिता संजय उमाटे हिला फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३५७(१) नुसार देण्यात यावे.

६. आरोपी क्र.१ ने त्याचे जामीन बंधपत्रास शरण यावे.

७. आरोपी क्र.२ चे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते. प्रकरणात सुरक्षा राशी जमा असल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर आरोपींना परत करण्यात यावी.

८. आरोपी क्र.२ हिने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे रूपये १०,०००/– चे नविन वैयक्तीक बंधपत्र द्यावे आणि तिचा जुना जामीन कदबा पुढील सहा महिन्याकरीता कायम ठेवण्यात येत आहे.

९. सदर प्रकरणामध्ये जप्त मुद्देमाल नसल्यामुळे त्याबाबत आदेश नाही.

१०. या न्यायनिर्णयाची प्रत आरोपी क्र.१ ला त्वरीत व विनामूल्य देण्यात यावी.

११. आरोपी क्र.१ ला तो प्रस्तुत न्यायनिर्णयास आव्हान देवु शकतो याची समज देण्यात आली.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित व अधिघोषित करण्यात आला.)

MANGALA GAJANAN HIVARALE
Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.09.08 16:46:07 +0530

स्थळ – वर्धा.
दिनांक ०८/०९/२०२६

(श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.९), वर्धा.

Certified that PDF copy of Judgment supra is word-to-word identical to the original Judgment.

( I.K.Khan )
Stenographer Grade-II